॥ ॐ ॥

# ‘स्व’-रूपवर्धिनी कार्यवृत्त

फेब्रुवारी २०२३

२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ४११ ०११.

(कार्यालय दूरध्वनी) : २६१२१७०४ भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६

Email : wardhinee@gmail.com

Website : http://www.swaroopwardhinee.org






## राष्ट्रीय विज्ञान दिवस

*२८ फेब्रुवारी १९२८ रोजी भारतीय भौतिकशास्त्रज्ञ*

***सर चंद्रशेखर वेंकट रामन***

*यांनी रामन परिणामाचा (रामन इफेक्ट)*

*शोध लावला. यासाठी त्यांना*

*१९३० मध्ये नोबेल पुरस्काराने गौरवण्यात आले.*

*त्यानंतर २८ फेब्रुवारी हा दिवस भारतामध्ये*

***राष्ट्रीय विज्ञान दिवस** म्हणून साजरा केला जातो.*

# प्रजासत्ताक दिन



२६ जानेवारी भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त 'स्व'-रूपवर्धिनीच्या वास्तूत श्री. माधव दाबके व डॉ. संजय तांबट यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजवंदनाचा कार्यक्रम संपन्न झाला. श्री. दाबके सरांनी 'गर्जे मराठी' या संस्थेकडून होणाऱ्या समाजोपयोगी उपक्रमांची माहिती दिली. त्याचा लाभ सर्वांनी घ्यावा असे सांगितले. बालवाडीच्या मुलांनी भारतमाता, सावित्रीबाई फुले, लता मंगेशकर, रमाबाई, पंडित नेहरु, जिजाबाई, जवान अशा वेशभूषा करून त्या त्या व्यक्तिमत्त्वांची ओळख दर्शवणारी घोषवाक्ये म्हटली.

बिबवेवाडी परिसरातील वर्धिनीच्या राजगड कार्यालयात प्रजासत्ताकदिनी नूतनीकरणानिमित्त भारतमाता पूजनाचा कार्यक्रम वर्धिनीतील सर्व विभाग प्रमुख, प्रकल्पप्रमुख, बिबवेवाडी व पद्मावती भागातील शाखाप्रमुख व शाखेतील युवा कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत झाला. गणेश नगर सोसायटीचे चेअरमन श्री. अंबादास सरांच्या हस्ते भारतमाता प्रतिमेचे पूजन



झाले. चऱ्होलीच्या कौशल्य विकास केंद्रात प्रजासत्ताक दिन व भारतमाता पूजन कार्यक्रमाची सुरुवात सौ. चारुता कडूरकर यांच्या प्रास्ताविकाने झाली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. केदार नाईक यांचे अतिशय उद्‌बोधक असे मार्गदर्शन झाले. श्री. केदारजी हे येरवडा भागाचे संपर्क मंडल सदस्य आहेत.

श्री योगी अरविंद सांस्कृतिक मंचातर्फे वर्धिनीचे ज्येष्ठ मार्गदर्शक स्व. जयंतराव कवठेकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ शालेय विद्यार्थ्यांची सूर्यनमस्कार स्पर्धा १८ जानेवारीला फुलोरा मैदानावर झाली. एकूण २१ शाळांमधील ४२ संघातून ६८० विद्यार्थी - विद्यार्थिनींनी यात भाग घेतला. ४२ परीक्षक, शाळांमधील ८० शिक्षक, कार्यकर्ते आणि सुमारे १०० नागरिक अशा १००० जणांनी या कार्यक्रमाचा आनंद घेतला. मा. मालतीताई दात्ये, मा. आमदार माधुरीताई मिसाळ आणि स्व. जयंतराव कवठेकर सरांचे चुलत बंधू श्री. जयंतराव कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.



# शाखा विभाग



शाखा विभागाने वार्षिक परीक्षेच्या दृष्टीने वर्धक-वर्धिकांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी विशेष प्रयत्न सुरु केले आहेत. याच पार्श्वभूमीवर अभ्यासाला प्रोत्साहन मिळावे म्हणून उत्कृष्ट शाखा चषक २०२२-२३ अशी संकल्पना घेऊन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. दि. २५ डिसेंबर २०२२ ते दि. १४ एप्रिल २०२३ या कालावधीत हा कार्यक्रम संपन्न होणार आहे. यामध्ये ६०० वर्धक-वर्धिका व २०० युवक-युवतींनी सहभाग नोंदवला आहे. सदर उपक्रमांतर्गत गणित, विज्ञान, भाषा, इतिहास, भूगोल अशा अनेक विषयांवर आधारित विविध कृती उपक्रम असणारी पुस्तिका प्रत्येक वर्धकाला देऊन आणि ती सोडवताना शालेय अभ्यासक्रमावर आधारित इयत्ताशः उपक्रमही सुचवले जातात. शाखा पातळीवर काही तज्ज्ञ कार्यकर्त्यांकडून याचे मूल्यांकन केले जाते. याशिवाय शाखेत दैनंदिन होणाऱ्या उपक्रमांवर आधारित केंद्रीय स्तरावर स्पर्धांचे



आयोजन करण्यात आले.

केंद्रीय पाढे पाठांतर स्पर्धा व हस्ताक्षर स्पर्धा या दोन स्पर्धा 'उत्कृष्ट शाखा चषक २०२३' या अंतर्गत आयोजित करण्यात आल्या. ह्याचे प्रशिक्षण शाखांवर डिसेंबर महिन्यापासून सुरू करण्यात आले होते. शाखा स्तरावर १ ते ३० पाढे नियमित



पाठांतर आणि हस्ताक्षर सराव चालू होता. यामधे काही शाखांनी नवनवीन पद्धती पाढे पाठांतरासाठी शोधून काढल्या (जसे की चाली लावून पाढे म्हणणे) दोन्हीही स्पर्धा ३ टप्प्यात घेण्यात आल्या.

पाढे पाठांतर स्पर्धेचे बक्षीस वितरण वर्धिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्रीमती लताताई पुरंदरे तर हस्ताक्षर स्पर्धेचे बक्षीस वितरण श्री. अरविंद केळकर यांच्या हस्ते करण्यात आले.





पाढे पाठांतर विजयी वर्धक –
इ. ५ वी – दितिक्षा चव्हाण, श्लोक पवार इ. ६ वी – वरद पवार, सार्थक खांडेकर
इ. ७ वी – वरद काळे, वेदांत ठोंबरे इ. ८ वी – आयुष बडंबे, समर्थ मटकर इ. ९ वी – सागर शिंदे
हस्ताक्षर विजयी वर्धक –
इ. ५ वी – दितिक्षा चव्हाण, गौरवी आचार्य. इ. ६ वी – मयुरंग खापरे, कैवल्य कवळे
इ. ७ वी – वरद काळे, भावना कांबळे, गौरव कांबळे
इ. ८ वी – कार्तिकी येवले, विठ्ठल एकलोरे. इ. ९ वी – नेहा परदेशी, नम्रता ब्यागरी

## सूर्याय नमः

दरवर्षीप्रमाणे रथसप्तमीनिमित्त दि. २८ जानेवारीला 'माझी शाखा, आमचे सूर्यनमस्कार' हा उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमात सर्व शाखा आणि कार्यकर्ते सर्वांनी मिळून एकूण ३१,७३८ सर्यनमस्कार घातले.



| | | |
|---|---|---|
| समर्थ रामकृष्ण शाखा–३८०० | स्वामी श्रध्दानंद शाखा – १६९१ | स्वामी योगानंद शाखा – १७०० |
| स्वामी दयानंद शाखा–४१२८ | स्वामी शिवानंद शाखा – २५०० | धर्मवीर शंभूराजे शाखा – ४२९० |
| स्वामी सुबोधानंद शाखा–७५० | राजर्षी शाहू शाखा – २३४० | स्वामी ब्रह्मानंद शाखा – ४१८८ |
| नरवीर तानाजी शाखा–२०८० | स्वामी अभेदानंद शाखा – २०८ | क्रांतीज्योती सावित्री शाखा–२०६६ |
| वीर अभिमन्यू बालशाखा–२०८ | वैयक्तिक सूर्यनमस्कार – ९०१ | व्यावसायिक युवक गट – ८८८ |








# युवा विभाग



◆ **ढाक बहिरी सहल –**

दि. १८ डिसेंबरला रॅपलिंगचे प्रशिक्षण व माहिती देऊन वर्धिनीचे युवक कार्यकर्ते श्री. निशिकांत वाईकर यांच्या मार्गदर्शनाने सहलीची उत्साहात सुरुवात झाली. गडावर पोहोचल्यावर परिचय सत्र घेण्यात आले. त्यामध्ये नाव, शिक्षण, शाखेतील जबाबदारी, आवड /छंद व भविष्यातील स्वप्नं या विषयावर संवाद साधण्यात आला. परिसराच्या भौगोलिक माहितीसोबतच अडथळे कसे पार करायचे, संकटाचा सामना कसा करायचा याविषयी युवांसोबत चर्चा घेण्यात आली. एकूण संख्या : ४०



◆ **समर्पण दिन –**

औरोंका भी हित हो जिसमें, हम ऐसा
कुछ करना सीखें ।।
देश हमें देता है सब कुछ, हम भी तो
कुछ देना सीखें ।।

◆ आपले काम शाश्वत रहावे व त्यामधे तन, मन, धन याची कधीही कमी पडू नये तसेच हे कार्य पुढील पिढीसाठी अविरतपणे चालू ठेवण्यासाठी यंदा मकरसंक्रांती निमित्त भाग-३ सिंहगड भागाचा समर्पण दिन उत्साहात झाला. हा कार्यक्रम दोन्ही शाखेतील पहिल्या फळीतील कार्यकर्त्यांपासून ते सध्या कार्यरत असलेल्या सर्व युवकांच्या उपस्थितीत संपन्न झाला. सर्व युवकांनी किशाभाऊंच्या प्रतिमेचे पुजन केले. त्यानंतर श्री. अजय कदम सरांनी किशाभाऊंच्या आठवणी सांगून कार्यकर्त्यांच्या समर्पण भावनेचे महत्त्व सांगितले.

◆ धायरी भागात समर्पण दिनानिमित्त श्री. विलास कुलकर्णी व श्री. मंदार रायरीकर यांनी किशाभाऊंच्या आठवणी सांगून उपस्थितांना समर्पणासाठी आवाहन केले. युवकांना महाशिबिराची कल्पना देत सर्वांनी शिबिरासाठी वेळ राखून ठेवण्याचा संकल्प केला. या कार्यक्रमात साधारण ४०-४५ युवकांचा सहभाग होता.

◆ दि. ८ जानेवारीला वर्धिनीच्या ओंकार सभागृहात युवती विभागाचा (भाग ५) समर्पण दिन पार पडला. वर्धिनीचे कार्यकर्ते श्री. पंकज मुंडे युवतींशी संवाद साधताना म्हणाले, 'छ. शिवाजी महाराजांनी माणसं कशी जोडून ठेवली-जपली, त्याप्रमाणे आपण केले पाहिजे.' अर्पण, तर्पण आणि समर्पण या संकल्पनांचा नेमका अर्थ सांगून त्यातील भेद लक्षात आणून दिला.

◆ भाग-१ समर्पण दिनाच्या कार्यक्रमात १९८३ च्या बॅच पासून ते सध्या काम करत असलेले शाखेचे युवक सहभागी झाले. भाग युवा प्रमुख राज जाधव दादाने प्रास्तविक मांडले. त्यानंतर सर्वांचा परिचय झाला. शाखा विभाग प्रमुख शुभम जगताप दादाने भाग-१ च्या शाखा रचना पद्धत आणि सद्यःस्थितीत चालू असलेले उपक्रम युवकांना समजावून सांगितले. या कार्यक्रमात ३० ते ३५ युवकांनी सहभाग नोंदवला.



# यशोवार्ता



आपल्या शंभूराजे शाखेचे युवक प्रमुख **श्री. संदेश मनवल** यांची नाबार्डमध्ये 'गट अ अधिकारी' (NABARD Grade officer) म्हणून निवड झाली आहे. त्याचे मनःपूर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

# वर्धकांनी करंडक जिंकला आणि मनंदेखील..



टाटा मोटर्स आयोजित कबड्डी स्पर्धेमध्ये वर्धिनीच्या कबड्डी संघाने प्रतिस्पर्धी संघांशी शर्थीची लढत देऊन विजय प्राप्त केला. ज्या संघाने साखळी सामन्यात आपल्याला पराभूत केले; अंतिम सामन्यात त्याच संघाला पराभूत करत जबरदस्त विजय मिळवत आपल्या खेळाने सगळ्यांचे लक्ष तर वेधून घेतले व कौतुकाची थाप घेतली. संपूर्ण कार्यक्रम संपल्यावर आवर्जून न विसरता वर्धिनीच्या संस्काराने संपूर्ण मैदानाची स्वच्छता, खुर्च्यांची आवराआवर, यासाठी कर्मचाऱ्यांना मदत करून आपल्या वर्धक व युवकांनी सर्व टाटा मोटर्स कर्मचाऱ्यांची मनं जिंकली.

विभागाचे पालक डॉ. विनेश नगरे, प्रशिक्षक जितेंद्र काळे व सतीश बिराजदार, शाखाप्रमुख पुष्कर सागडे व सर्व खेळाडू वर्धकांचे अभिनंदन.

# स्वरूपमित्र समुपदेशन विभाग



विभागाने या महिन्यात वर्धिनीचे विभाग आणि शाखा सोबत तसेच काही शाळांमध्येही बौद्धिक सत्रांचे आयोजन केले. मैत्री, नाते अशा भावनिक विषयावर पालकांशी संवाद साधून कौटुंबिक वातावरण आनंदी राहावे यासाठी प्रयत्न केला. विद्यार्थ्यांना आगामी परीक्षांच्या दृष्टीने आवश्यक अशा अभ्यास कौशल्यांची ओळख करून दिली. वर्धिनीत नियमित काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची प्रेरणा टिकून राहावी म्हणून समुपदेशन नेहमीच आग्रही असतो.

| दिनांक | विषय | वक्ते | शाळा / शाखा | संख्या |
|---|---|---|---|---|
| ७ डिसेंबर | मैत्री | सौ.मेघाताई नगरे | सेनापती बापट माध्यमिक विद्यालय (माले) | ५४ |
| १५ डिसेंबर | नाते तुझे माझे | श्री.मंदार पोफळे | स्वामी दयानंद शाखा (पालकसभा) | १७ |
| २२ डिसेंबर | 'स्व'ची ओळख | सौ.विशाखा वेलणकर | सर्व विभागातील कार्यकर्त्यांसाठी | ३० |
| २३ डिसेंबर | अभ्यास कौशल्य | सौ.मेघाताई नगरे | रामराज्य विद्यालय (बिबेवाडी) | ३५० |
| २४ डिसेंबर | नियोजन | --''-- | प्रियदर्शनी शाळा (बिबवेवाडी) | २७६ |
| २८ डिसेंबर | नाते तुझे माझे | श्री.अक्षय कदम | स्वामी अभेदानंद शाखा (पालकसभा) | २४ |







**अभिनंदन :** ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि भटके-विमुक्त आयोगाचे अध्यक्ष, रा. स्व. संघाचे माजी प्रांत कार्यवाह **मा. भिकुजी (दादा) इदाते** यांना समाजकार्यासाठी, तर ज्येष्ठ हिंदुत्ववादी लेखक आणि विचारवंत **मा. रमेश पतंगे** व लोकसाहित्याचे अभ्यासक ज्येष्ठ लेखक **प्रा. प्रभाकर मांडे** यांना साहित्यासाठी भारत सरकारने **पद्मश्री पुरस्काराने** सन्मानित केले. या तिन्ही ज्येष्ठ कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

# आपुलकी, प्रेम म्हणजे...

बिबवेवाडी भागातील शिवतेज अभ्यासिकेत काही पालकांना वैयक्तिक भेटण्यासाठी बोलावले होते.

मी आले आहे हे कळाल्यावर एक पालक स्वतःहून मला भेटायला आल्या आणि म्हणाल्या, 'ताई, आपले घर वरच्या चढावर आहे बरं का. तुम्हाला चहा, कॉफी काही करून आणू का ? काही लागल्यास हक्कानं सांगा. आपलंच घर आहे. लाजू नका.'

तेवढ्यात दुसरे पालक भेटण्यासाठी दिलेल्या वेळेत आल्या आणि त्यांनी सुद्धा चहा-पाण्याची चौकशी केली. इतकी आपुलकी बघून माझ्या डोळ्यात पाणी आले. स्वतःला सावरून कामाला सुरुवात केली.

आरुषची आई भेटायला आली आणि म्हणाली, 'माझ्या मुलाला वाचायला नीट येत नव्हते पण या अभ्यासिकेमुळे त्याचे वाचन खूप सुधारले आहे आणि त्याची त्याला गोडी लागली आहे.'

ऐकून खूप छान वाटले आणि कामाची गरजही लक्षात आली.

मनात विचार आला, 'आजूबाजूच्या सोसायटीत काय चित्र आहे आणि इथे मात्र खूप वेगळा अनुभव मिळाला.' आपल्या शाखेतील मुलांचा व्यक्तीशः संपर्क आणि रोजच्या कामातून साधलेली जवळीक पालकांच्या बोलण्यातून जाणवली.

# उत्थान विभाग



◆ **सावित्रीबाई फुले जयंती :** दि. ३ जानेवारीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त आर्यभट अभ्यासिका, समता भूमी अभ्यासिका व गुरुकुल अभ्यासिका या अभ्यासिकांमधील मुलांनी पदयात्रा काढून महात्मा फुले वाड्याला भेट दिली. प्रियदर्शनी अभ्यासिकेत चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. अण्णा भाऊ साठे अभ्यासिका व सावित्रीबाई फुले अभ्यासिका येथे सावित्रीबाईंच्या कार्याची माहिती मुलांना अभ्यासिका प्रमुखांनी सांगितली.

◆ **पालक सभा :** जानेवारी महिन्यात डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम या अभ्यासिकेमध्ये घेण्यात आलेल्या पालक सभेत पालकांना वर्धिनीचा माहितीपट दाखवण्यात आला.

◆ **क्षेत्रभेट :** ठिकाण : राजगड, संख्या : ५०, कालावधी : दि. २८ व २९ जानेवारी

कसबा व लष्कर भवानी भागाची राजगड येथे निवासी सहल काढण्यात



आली. छ. शिवाजी महाराजांचा इतिहास मुलांना समजावा, गडाविषयी आवड निर्माण व्हावी तसेच कृतिपुस्तिकेमधील क्षेत्रभेट उपक्रमाची अभ्यासपूर्ण तयारी कशी करावी हा सहलीचा उद्देश होता. गडावरील हत्तीचा नेढ, संजीवनी माची, बालेकिल्ला यांची ऐतिहासिक व भौगोलिक माहिती मुलांना देण्यात आली. या सहलीतून मुलांमध्ये आत्मविश्वास, शारीरिक क्षमता वाढ, संघटन, मैत्री अशा अनेक गुणांची भर पडली.

◆ **माहिती व सल्ला मार्गदर्शन केंद्र (समुपदेशन) :** प्रजासत्ताक दिनानिमित्त महात्मा फुले भागातील अभ्यासिकांनी एकत्रितपणे सादर केलेल्या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्री. चेतन कुसाळकर, श्री. अभय ठकार उपस्थित होते. मुलांनी देशभक्तीपर गाणी सादर केली.

◆ **मनोगत - 'शिकू आनंदे'**

वर्धिनीच्या गुरुकुल आणि समता अभ्यासिकेत समुपदेशन विभागांतर्गत मी आणि हेमांगी गुरुवारी संध्याकाळी नेहमीप्रमाणे गेलो. मुले आमच्या ॲक्टिव्हिटीसाठी वाटच बघत होती.

ओळीत बसल्यावर जागा बदलण्यासाठी मुलांची तक्रार सुरू झाली. हा असा... ती अशी... यालाच ॲक्टिव्हिटीचं स्वरूप देऊयात का मनात विचार आला. जागा न बदलता प्रत्येकाने आपल्या उजव्या व डाव्या बाजूच्या मुलाचे/मुलीचे नाव सांगून तिचा आवडलेला गुण सांगायचा असे ठरले. मुलांना मजा वाटली आणि बघता बघता ५० मुलांनी ५० गुण सांगितले. त्यात मदत करते, शांत आहे, मनमिळावू आहे, अभ्यासू आहे, चित्र छान काढतो, अक्षर

छान आहे, खूप अभ्यास करतो, अभ्यासात मदत करतो, भांडण झालं तरी लगेच विसरतो असे अनेक गुण ऐकायला आले. कुणीच कुणाबद्दल वाईट बोलले नाही याचं खूप कौतुक वाटलं.

त्यानंतर हेमांगीताईंनी एका गोष्टीतून 'आपल्या घरातील मोठ्यांचं सांगणं का ऐकायचं असतं व महत्त्वाचं असतं' हे सांगितलं. त्यानंतर स्मरणशक्तीच्या खेळात 'साताऱ्याचा म्हातारा शेकोटीला आला...' या गाण्यात सर्वजण सहभागी झाले. सततच्या संवादातून मुलांमध्ये झालेला सकारात्मक बदल लक्षात आला.

**– सई बापट**

## स्पर्धा परीक्षा केंद्र



'युवा चेतना मंच' ह्या सामाजिक संस्थेचे संस्थापक श्री. दत्ताजी शिर्के यांनी ९ फेब्रुवारीला स्पर्धा परिक्षा केंद्राला भेट दिली. नागपूर गडचिरोली भागात श्री. दत्ताजी शिर्के प्रेरणादायी कार्य करीत आहेत. त्यांनी गडचिरोली भागात लोकसहभागातून पुलाचे बांधकाम पूर्ण केले. त्यामुळे या भागात दळणवळण आणि उत्तम संपर्क होण्यास मदत झाली. गडचिरोली भागात विद्यार्थांची अधिकारीपदी निवड झाली तर हक्काने या भागात सेवेसाठी यावे असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.



**अभिनंदन :** दि. ५ फेब्रुवारीला जोगळेकर कुल वृतांत समितीतर्फे कै. प्रभाकर शिवराम उर्फ मामासाहेब जोगळेकर यांच्या स्मरणार्थ **श्री. शिरीष पटवर्धन** (उपाध्यक्ष – 'स्व'-रूपवर्धिनी) यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## पाकोळी बालवाडी



जानेवारी महिना म्हणजे संक्रांत उत्सवाची लगबग, तयारी जोरदार सुरू असते. या वर्षी संक्रांत उत्सवाची संकल्पना स्व. लता दीदींना आदरांजली अशी होती. त्यांनी गायलेल्या बालगीत, कोळीगीत, शौर्यगीत यावर नृत्य सादर झाले. 'आज गोकुळात रंग...', 'ऐरणीच्या देवा



तुला...', 'वल्हव रे नाखवा...', 'वेडात निघाले...', 'खेळ मांडीयेला...' या



गाण्यांवर बालचमूंनी व बाल शाखेतल्या मुलांनी मनमोहक नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

दि. २४ जानेवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनात झालेल्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित सौ. दीपालीताई अवकाळे यांनी पालकांशी



'आनंदी पालकत्व' या विषयावर संवाद साधला. एका गोष्टीतून पालकांनी बदलत्या काळानुसार आपल्यात बदल का व कसे करावेत, त्याचा आपल्या पाल्यावर कसा परिणाम होतो, घरात मोठ्या व्यक्तींच्यात संवाद कसा असावा हे त्यांनी सांगितले. गोष्टीला सर्वांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला. वर्धिनीचे उपाध्यक्ष श्री. शिरीष पटवर्धन, कार्यवाह श्री. विश्वास कुलकर्णी, मा. पुष्पाताई नडे यांनीही बाळगोपाळांना कौतुकाची थाप दिली. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

दि. २ जानेवारीला गुरुकुल चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेचा बक्षीस समारंभ दि. २६ जानेवारीला झाला. वर्धिनी पाकोळी बालवाडीला 'सातत्यपूर्ण सहभागाचे' विशेष सन्मानचिन्ह देण्यात आले.

दि. २७ जानेवारीला बोरन्हाण आणि त्या महिन्यातील मुलांचे वाढदिवस साजरे झाले. छोट्या गटातील मुलांच्या पालकांनी मुलांसाठी हलव्याचे दागिने बनवले होते. बोर, ऊस, गोळ्या वेचण्याचा आनंद मुलांनी घेतला.

दि. २८ जानेवारी रथसप्तमीला सकाळी ६ वाजता वर्धिनीच्या माडगावकर सभागृहात शिक्षिकांनी गायत्री मंत्राचे पठण, उपासना करून सूर्यनमस्कार घातले. श्री. शिरीष पटवर्धन सरांनी सूर्यनमस्काराचे तंत्र स्पष्ट करताना कै. कवठेकर सरांच्या सूर्यनमस्काराच्या आठवणी सांगितल्या.









## महिला विभाग



**◆ जिजामाता जयंती :**

दि. १२ जानेवारीला लाल महालात जिजामाता जयंतीनिमित्त युवती कार्यकर्ती कु. समृद्धी यादव हिचे व्याख्यान झाले. जिजाबाईंच्या प्रेरणादायी चरित्राबरोबर तिने वेगवेगळ्या क्षेत्रातल्या यशस्वी महिलांचे कार्य व जिजाबाईंचा वारसा घेऊन आज घरोघरी मुलांचे भविष्य घडवणाऱ्या मातांची उदाहरणे सर्वांसमोर मांडली. टाळ्यांच्या गजरात समृद्धीचे सर्वांनी कौतुक केले. या कार्यक्रमास बालवाडी, नर्सिंग विभाग शिक्षिका व महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

## रुग्ण सहाय्यक वर्ग

**◆ प्रजासत्ताक दिन :**

पुणे वर्गाच्या मुली व शिक्षिका के. ई. एम. हॉस्पिटलमधील झेंडावंदन कार्यक्रमाला उपस्थित राहिल्या. माले वर्गातील मुली झेंडावंदनासाठी ग्रामपंचायतीमधील व प्राथमिक शाळेतील कार्यक्रमात सहभागी झाल्या. मुलींनी तेथे राष्ट्रभक्तीपर गीत सादर केले.

सध्या दोन्ही वर्गाच्या मुली कामांच्या प्रत्यक्ष अनुभवासाठी दवाखान्यांमध्ये काम करत आहेत. हॉस्पिटलमधील कामातून त्यांना विविध प्रकारची उपकरणे हाताळायला मिळतात. वेगवेगळ्या आजारांची, त्यावरील उपचारांची, औषधांची माहिती मिळते आणि प्रत्यक्ष अनोळखी व्यक्तींशी होणाऱ्या संवादांतून त्यांचे संवाद कौशल्यही वाढते.

◆ **शिबिर :**

या अभ्यासक्रमामधील एक महत्त्वपूर्ण उपक्रम म्हणजे निवासी शिबिर आणि सहल. शिबिरात होणाऱ्या विविध व्याख्यानातून मुलींना नव्या विषयांची ओळख होते. दि. ३ ते ५ फेब्रुवारीला झालेल्या निवासी शिबिरात पुणे, माले व चऱ्होली या तीनही वर्गांतील ७० मुली सहभागी झाल्या.

**कार्यक्रम पत्रिका**

| वक्ते | | विषय |
|---|---|---|
| दि. ३ फेब्रुवारी – | | |
| | सौ. नंदिनी जाधव | अंधश्रद्धा |
| | डॉ. लीना बावडेकर | मसाल्याचा डबा |
| | सौ. दीपाली अवकाळे | कुटुंब आणि मी |
| दि. ४ फेब्रुवारी – | | |
| | श्री. किशोर काळोखे | माझे करियर घडवताना |
| | डॉ. माधव केळकर | अतिदक्षता विभागात काम कसे करावे ? |
| | सौ. नेहा दिवे | मुलाखतीला सामोरे जाताना |

व्याख्यानातील काही विशेष मुद्दे –

◆ सौ. नंदिनीताईंनी विषय मांडताना काही प्रात्यक्षिके करून दाखवली. त्यात मुलींनाही सहभागी करून घेतले आणि त्यामुळे त्यातील विज्ञान सगळ्यांच्या लक्षात आले. त्या म्हणाल्या, ''सर्वत्र दिसणाऱ्या चमत्कारांमागे हातचलाखी जास्त असते. त्यामागील विज्ञान आणि तंत्र आपण स्वतः ओळखून वागलं पाहिजे. श्रद्धा असावी पण तिला अंधश्रद्धेचे स्वरूप देऊ नका. आत्मविश्वास वाढवून तुम्ही ठरवलेले ध्येय गाठा आणि यशस्वी व्हा.''

◆ प्रत्येक महिलेचे स्वयंपाकघराशी अतूट नाते असते. पदार्थ बनवताना अनेक प्रकारचे मसाले वापरले जातात. त्याचे औषधी गुणधर्म डॉ. लीनाताईंनी सोप्या भाषेत सहज संवादातून स्पष्ट केले. रोजच्या वापरातला मसाल्याचा डबा हा औषधाचा बटवा आहे, त्याचा आपण वापर केला पाहिजे हे सगळ्यांच्या लक्षात आले.

◆ सौ. दीपालीताईंनी संवादातून, खेळांतून, कुटुंबात आणि समाजात माझे स्थान कसं असलं पाहिजे, त्यासाठी माझे आचार-विचार कसे असावेत हे सांगितले. कुटुंबात मला स्वातंत्र्य हवे असेल तर मी आर्थिकदृष्ट्या, शारीरिकदृष्ट्या आणि भावनिकदृष्ट्या स्वतंत्र असली पाहिजे आणि यासाठी मी विचारपूर्वक, कृतीपूर्वक स्वतःला वाढवायला हवे असे प्रतिपादन केले.

◆ श्री. किशोर काळोखे सरांनी नर्सिंग पेशातील 'सेवा व समाधान' या महत्त्वाच्या गोष्टी मुलींशी प्रश्नोत्तरातून स्पष्ट केल्या. काही प्रेरणादायी कविता, गाणी एकत्रित म्हटल्याने विषय नीट पोहोचला.

ते म्हणाले, 'आपण जेव्हा रुग्णाशी आत्मियतेने, प्रेमाने बोलत असतो ते एक प्रकारे त्याचे समुपदेशन असते. होणाऱ्या त्रासातून तो लवकर बरा होतो. ज्याप्रमाणे आपल्या वर्तणुकीमुळे आपले कुटुंब, घर ओळखले जाते त्याप्रमाणेच आपण शिकत असलेली संस्था आपल्या कामाने, सर्व कार्यकर्त्यांमुळे मोठी होते, तिची खरी ओळख समाजाला पोहोचते. म्हणून हे लक्षात असू द्या 'माझी ओळख म्हणजे माझे काम.''

◆ डॉ. माधव केळकर सरांनी ICU - अतिदक्षता विभागातल्या कामाची ओळख व जबाबदारी मुलींना स्पष्ट केली. याचा उपयोग त्यांना कोर्स पूर्ण झाल्यावर निश्चितच होईल.

◆ शिबिराचा समारोप करताना सौ. नेहा दिवे ताईंनी मुलाखतीचे तंत्र व मंत्र तसेच नोकरीसाठी अर्ज कसा करावा हे सांगितले. दवाखान्यात काम करताना काळजी बाळगून आणि निरीक्षण करून सतत शिकत रहा. नवीन साधनांची/विषयांची ओळख करून घ्या. त्यासाठीचे अभ्यासवर्ग करायची संधी सोडू नका असेही सांगितले.

दि. ५ फेब्रुवारीला पुणे दर्शन सहलीने शिबिराची सांगता झाली. पुण्यातील आगाखान पॅलेस, इस्कॉन मंदिर, तळजाई मंदिर व टेकडी, सिंबायोसिसचे डॉ. आंबेडकर संग्रहालय, चतुःश्रृंगी मंदिर ही ठिकाणे सर्वांनी बघितली.

खूपशा विद्यार्थिनींना सहल आणि शिबिर हा अनुभव नवीन होता. शिबिरातून सर्व वर्गातील मुलींची ओळख झाली. एकत्रितपणे सर्व व्यवस्थांमध्ये काम करताना, विविध गुणदर्शन कार्यक्रमातून वेगळे गुण अनुभवतानाचा आनंद सगळ्यांना मिळाला.











## श्रद्धांजली

◆ 'स्व'-रूपवर्धिनी संस्थेचे माजी अध्यक्ष स्व. पुरुषोत्तमभाई श्रॉफ यांच्या पत्नी **श्रीमती सुधाबेन श्रॉफ** यांचे वयाच्या ९४ व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. वर्धिनीच्या स्थापनेपासून श्रॉफ परिवार वर्धिनीच्या कामाचा आधार राहिला आहे. त्यांचे आजही वर्धिनीला विविध प्रकारे साहाय्य होत असते.

◆ स्वामी विवेकानंद शाखेचा युवक हर्षल सोनार याचे वडील **श्री. लक्ष्मीकांत सोनार** यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.

◆ राष्ट्र सेविका समिती पश्चिम महाराष्ट्र प्रांत बौद्धिक प्रमुख **मा. सौ. शैलाताई जोशी** यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.

◆ वर्धिनीच्या सर्वसाधारण सभेच्या सदस्या डॉ. प्राचीताई साठे यांचे पती 'खुला आसमान'चे संस्थापक **श्री. मिलिंद साठे** यांचे दुःखद निधन झाले. वर्धिनीची वेबसाईट सुरू करताना तांत्रिक कामात त्यांचे सहकार्य लाभले होते. तसेच त्यानंतरही या विषयातील त्यांचे मार्गदर्शन मिळत होते.



**परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.**
**वर्धिनीचा परिवार या सर्वांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे.**



◆ ◆ ◆